# वसई विरार शहर महानगरपालिका
## लेखापरीक्षण विभाग, मुख्यालय

जा.क्र. :- वविशम/मुलेप/.५००/२२-२३
दिनांक:- 03/02/2023

## "जाहिर दरपत्रक"

वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लेखापरीक्षण विभागामधील खाली उल्लेख केल्याप्रमाणे काम करावयाचे असून सदर काम करण्यास इच्छुक एजन्सी यांनी त्यांच्या लेटरपॅडवर खालील उल्लेख केलेल्या कामांच्या बाबींचे दर (सर्व करासहीत) दि. 03/02/2023 रोजी दुपारी 3:00 वा. पर्यंत बंद लिफाफ्यातून दरपत्रक (कोटेशन) मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रके वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, विरार (पूर्व) आवक बारनिशीकडे सादर करण्यात यावी.

| अ. क्र. | तपशिल | दर (रूपये) (सर्व करांसहीत) | |
|---|---|---|---|
| | | अंकात | अक्षरात |
| १ | राष्ट्रीय लेखा नियम पुस्तिका (NMAM) २००४ तरतूदींनुसार तयार करण्यात आलेल्या खालील विवरणपत्रांचे लेखापरीक्षण करणे.<br>a. ताळेबंदपत्रक (Balance Sheet),<br>b. उत्पन्न व खर्च विवरणपत्र (Income and Expenditure Statement),<br>c. रोख प्रवाह विवरणपत्र (Statement of Cash Flows),<br>d. जमा व प्रदाने विवरणपत्र (Receipts and Payments Account),<br>e. लेख्यांवरील भाष्य (Notes to Accounts),<br>f. वित्तीय कार्यक्षमतेबाबतचे निर्देशक (Financial Performance Indicators),<br>g. कायद्यानुसार स्थापित केलेले विविध निधींचे लेखे उदाहरणार्थ, वृक्ष प्राधिकरण निधी, आग सुरक्षा निधी व अनुषंगिक निधींचे लेखे,<br>h. राष्ट्रीय लेखा नियमपुस्तिका (NMAM) २००४ मधील परिशिष्ट १ मधील नमुने व नोंदवह्या. | | |

Scanned with CamScanner

## -: अटी-शर्ती :-

१) दि.१ जानेवारी, २०२२ रोजी इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया, नवी दिल्ली द्वारे जारी केलेले वैध "सर्टिफिकेट ऑफ प्रॅक्टिस" प्रमाणपत्र असावे. सनदी लेखापाल यांस किमान मागील दहा वर्षांचा अनुभव असावा. सदर संस्था ही सनदी लेखापाल संस्था, भागीदारी संस्था किंवा मर्यादित दायित्व भागीदारी असलेली संस्था यापैकी संस्था असल्यास दरपत्रक भरण्यास पात्र राहील.

२) शासकीय/निम शासकीय/शासकीय अधिपत्याखालील महामंडळे/स्थानिक प्राधिकरणे/संस्था यामधील संबंधित दरपत्रकधारकाचा लेखापरीक्षणाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच सदर कामांची यादी जोडणे आवश्यक आहे.

३) आयकर कायदा १९६१ च्या कलम ४४एबी नुसार संस्थेच्या मागील दोन वर्षांचे (सन २०२०-२१ आणि सन २०२१-२२) लेखापरीक्षण झाल्याचे अथवा आयकर वार्षिक विवरणपत्र असले पाहिजे. सन २०२१-२२ या वित्तीय वर्षातील दरपत्रकधारकाची वार्षिक उलाढाल किमान रु.१० लाख वा त्यापेक्षा अधिक असल्याचे सनदी लेखापालाने त्याच्या वैध UDIN क्रमांकासह प्रमाणित केलेले असले पाहिजे.

४) दरपत्रकधारकाचे आयसीएआय नोंदणी प्रमाणपत्र, पॅन कार्ड जोडणे बंधनकारक राहील.

५) दरपत्रकास मंजुरीची समज दिल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहून ७ दिवसांत करारनामा करावयाचा आहे. मुदतीत करारनामा न केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.

६) दरपत्रकासोबत कामाच्या एकूण रकमेच्या १ टक्का इसारा रक्कम (उदा. १० लक्ष रकमेच्या १ टक्का रक्कम रु.१० हजार) डी.डी. स्वरुपात वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या नावाने तांत्रिक बाबीच्या लिफाफ्यामध्ये सादर करण्यात यावा.

७) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार महानगरपालिकेस राहील.

८) दरपत्रक बिनशर्त असावे. सशर्त दरपत्रक नाकारण्यात येईल.

९) वरील अटींचे पालन जे दरपत्रकधारक करणार नाहीत, त्यांचे दरपत्रक पडताळणअंती अपात्र ठरविण्यात येईल.

Scanned with CamScanner

१०) दरपत्रके मुदतीमध्ये व कार्यालयीन वेळेमध्ये वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालयातील आवक-जावक विभागात सादर करणे बंधनकारक राहील. सदर दरपत्रके स्वत:चे लेटरपॅडवर बंद पाकिटातून दोन लिफाफा पध्दतीने (तांत्रिक बाबीचा लिफाफा क्र.१ व वित्तीय बाबीचा लिफाफा क्र.२) दि.13/02/२०२३ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालय, विरार येथे सादर करावीत.

११) मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि.13/02/२०२३ रोजी सायं.४.०० वाजता मा. मुख्य लेखापरीक्षक यांचे दालनात दरपत्रकदार अथवा त्यांचे प्रतिनिधी उपस्थित/अनुपस्थित असल्यास दरपत्रक उघडण्यात येतील.

दिनांक :-

ठिकाण :- वसई विरार शहर महानगरपालिका, मुख्य कार्यालय

मुख्य लेखापरीक्षक
वसई विरार शहर महानगरपालिका

Scanned with CamScanner